# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
website: www.dteau.org email:educationsection@dteau.org

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१६/6070
दिनांक :- 30 NOV 2016

प्रति,
प्राचार्य,
सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था,
विभाग-औरंगाबाद

विषय:- राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्ती करण्या बाबत.

संदर्भ:- १. म.शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टिईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३ ऑक्टोबर २०१६.
२. मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचे पत्र क्र. टिईम-२०१५/ /प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक ०९ नोव्हेंबर २०१६
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१५/तंशिसं/अर्थसं/इबीसी/ नि.वि./२०१६-१७/१६२ दिनांक २४.११.२०१६

महोदय,

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागा कडून 'राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना' राबविणे संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाने सदर योजना राबविण्यासाठी संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळापत्रक प्रदर्शित केले आहे. तसेच संदर्भ क्र.३ नूसार सदर योजनेचा लाभ दिनांक ०५.१२.२०१६ पर्यन्त देणे बाबत सूचित केले आहे. त्यामुळे या कार्यालयाकडून विद्यार्थ्यांच्या अर्जावर मंजुरीची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येणार आहे.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने सर्व संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, संस्थेच्या लॉगीनमधून शिक्षणशुल्क समिती व्दारे मंजूर झालेल्या शैक्षणिक शुल्काबाबतची वर्ष निहाय, अभ्यासक्रम निहाय माहिती तातडीने भरण्यात यावी. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता शिक्षण शुल्क समिती व्दारे फी मंजूर झालेली नसल्यास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षासाठी मंजूर शैक्षणिक शुल्क भरण्यात यावे किंवा ॲडहोक फी भरण्यात यावी. शैक्षणिक शुल्काबाबतची माहिती संस्थेने भरणे आवश्यक असून सदरची माहिती त्वरीत भरण्यात यावी अन्यथा संबंधित संस्थेच्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर केले जाणार नाहीत. तसेच संस्थेतील कोणताही पात्र विद्यार्थी अर्ज करण्यापासून वंचित राहणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

( महेश शिवणकर )
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.